**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (पश्चिम),
ता.वसई, जि.पालघर - ४०१ ३०३.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasalvirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./वाचना/१८/२०२५-२६
दिनांक : ०३/०६/२०२५

## जाहीर दरपत्रक सूचना

वसई विरार शहर महानगरपालिकेची सर्व सार्वजनिक वाचनालये, त्यांच्याशी संलग्न अभ्यासिका व इतर स्वतंत्र अभ्यासिकांसाठी सन २०२५-२६ वित्तिय वर्षाकरीता लागणारी मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती व इतर भाषेतील पुस्तके तसेच शैक्षणिक पुस्तके दरपत्रक मागवून खरेदी करणेकामी महानगरपालिकेच्या, संकेतस्थळावर व सूचना फलकावर जाहिर दरपत्रक प्रसिध्द करण्यात येत आहे. त्याद्वारे नोंदणीकृत व योग्य त्या वर्गातील ठेकेदाराकडून नमूद कामासाठी सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रके दि.०३/०६/२०२५ ते दि.११/०६/२०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायं ५.०० वाजेपर्यंत वसई विरार शहर महानगरपालिका सार्वजनिक वाचनालय विरार, दुसरा मजला विरार (पूर्व) येथे सुट्टीचे दिवस वगळून जमा करावीत. पुरवठा करावयाचे साहित्य व इतर बाबींचा तपशील तसेच अटी-शर्ती दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या आहेत.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | दर (सुट टक्केवारीत नमूद करावी) |
|---|---|---|
| अ | सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरिता उक्त नमूद सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी मराठी भाषेतील कथा, कादंबरी, लेख, चरित्र, व इतर पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मुळ किंमतीवर किती सुट देणार ? | टक्केवारी प्रती नग |
| ब | सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरिता उक्त नमूद सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी हिंदी भाषेतील कथा, कादंबरी लेख, चरित्र, व इतर पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मूळ किमतीवर किती सुट देणार ? | टक्केवारी प्रती नग |
| क | सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरिता उक्त नमूद सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी इंग्रजी भाषेतील कथा, कादंबरी लेख, चरित्र, व इतर पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मूळ किमतीवर किती सूट देणार ? | टक्केवारी प्रती नग |
| ड | सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरिता उक्त नमूद सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी गुजराती व इतर भाषेतील कथा, कादंबरी, लेख, चरित्र, व इतर पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मूळ किमतीवर किती सुट देणार ? | टक्केवारी प्रती नग |
| इ | सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरिता उक्त नमूद सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी शैक्षणिक पुस्तकाच्या प्रकाशनाच्या मुळ किमतीवर किती सुट देणार? | टक्केवारी प्रती नग |

**अटी शर्ती :-**

१) दरपत्रकधारकाने दरपत्रक भरताना व्दि - लखोटा पध्दतीचा अवलंब करावा, तसेच लखोटा क्र.०१ (तांत्रिक बाबी) मध्ये खालील कागदपत्रांचा समावेश असणे आवश्यक आहे. दरपत्रकधारकाने (अ) पॅनकार्ड, (ब) आधारकार्ड, (क) वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र, (ड) मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप्स ॲक्ट अंतर्गत निविदाशुल्क व बयाणा रक्कम पावती अथवा कायद्याने नोंदणी असणे आवश्यक आहे, (इ) शासकीय / निमशासकीय कार्यालयामध्ये मागील तीन आर्थिक वर्षातील संबधीत बाबींचा पुरवठा केल्याचा रुपये ५ लक्षावरील कार्यादेश किंवा समकक्ष कामाचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील इ. कागदपत्रांची छायांकित प्रत स्वयंसाक्षांकित करावी, (ई) सोबत इसारा रक्कम (एकूण रक्कमेच्या १%) रु. १०,०००/- इसारा रक्कमेचा धनाकर्ष इ. कागदपत्रे एकत्रित लखोटा क्र. ०१ (तांत्रिक बाबी) मध्ये सादर करावयाची आहेत. लखोटा क्र. ०२ (वित्तिय बाबी) मध्ये दरपत्रकधारकाने उक्त नमूद साहित्यासाठीचे दर टक्केवारीत सादर करावयाचे आहेत.

२) मुदतीत प्राप्त झालेली कोणतीही अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. आयुक्त-वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

३) दरपत्रकधारकाने नमूद वाचनसाहित्याचा पुरवठा सार्वजनिक वाचनालयाने नेमून दिलेल्या ठिकाणी मुदतीत व वेळेत करावयाचा आहे.

४) मनुष्यबळ, वाहन व यंत्रसामुग्री महानगरपालिका पुरविणार नाही.

५) नैसर्गिक आपत्तीमुळे होणा-या जिवित व वित्त हानीस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

६) शासनाचे कर शासनास / महानगरपालिकेच्या फंडात जमा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची आहे.

७) वरील अटीचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येईल.

८) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर दरपत्रकधारकाने ०५ दिवसांचे आत कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून सदरच्या कामाचा करारनामा रु.५००/- च्या स्टॅम्पपेपरवर करावयाचा असून मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल. करारनामा करण्यापूर्वी रु. ३०,०००/- सुरक्षा अनामत रक्कम धनाकर्षाव्दारे भरणा करणे बंधनकारक आहे. तदनंतर कार्यादेश देण्यात येईल.

९) करारनामा झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव कामातून माघार घेता येणार नाही. असे झाल्यास संबंधित दरपत्रकधारकाने भरलेली सुरक्षा अनामत रक्कम व इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

१०) सदरचे जाहिर दरपत्रक महानगरपालिकेच्या सूचना फलकावर व अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

११) मुदतीत प्राप्त झालेली कोणतीही अथवा सर्व दरपत्रके शक्य झाल्यास दि.११/०६/२०२५ रोजी सायं ५.३० वाजता अथवा दुसऱ्या दिवशी कार्यालयीन वेळेत दरपत्रक समिती यांचे समक्ष व दरपत्रकधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत उघडण्यात येतील.

(संजय हेरवाडे)
अतिरिक्त आयुक्त (वाचनालय)
वसई विरार शहर महानगरपालिका